MHST160006362006

नियमित दिवाणी दावा क्र.१६४/२००६
हणमंत यशवंत साळूंखे वि. रमेश मारूती इंगवले वगैरे.

<u>निशाणी क्र.१९८ वरील आदेश</u>

०१. प्रस्तुतचा अर्ज वादीने त्यांचा ज्यादा सरतपास घेण्यासाठी परवानगी मिळावी म्हणून दाखल केलेला आहे. प्रतिवादी तर्फे नि.क्र.१९८ वर त्यांचे म्हणणे दाखल करून सदर अर्जास हरकत घेतली आहे. वादी व प्रतिवादी यांचे सुविद्य विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही विधीज्ञांनी अर्जातील व म्हणण्यातील कथनांच्या अनुषंगाने सुसंगत युक्तीवाद सांगितला.

०२. वादीचे कथनांनुसार त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.१८७ वर दाखल केले आहे. त्याप्रमाणे वादीचा सरतपास वादी यांचे माहितगार वकिल यांनी दिनांक २२.०७.२०२५ रोजी घेतलेला आहे. त्यानंतर, याकामी कोर्ट कमिशन अहवाल तालूका–निरीक्षक, भुमी अभिलेख यांचेतर्फे दाखल झालेला आहे. त्यामुळे, वादी यांचा ज्यादा सरतपास घेणे सदर दाव्याच्या न्यायाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. वास्तविक, वादी यांनी त्यांचे सरतपास कलम १९ मध्ये कोर्ट कमिशन अहवाल दाखल झाल्यानंतर ज्यादा सरतपास देण्याबाबत लिहीलेले आहे. नि.क्र.१३३ चे कोर्ट कमिशन अहवाल तालूका निरीक्षक भुमी अभिलेख यांचे मार्फत दाखल झाला असल्याने त्यानुसार वादी यांचा ज्यादा सरतपास घेणे आवश्यक आहे. सबब, वरील नमुद कारणास्तव वादीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

०३. प्रतिवादी क्र. ३ यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल करून अर्जास हरकत घेतली आहे. प्रतिवादींचे कथनानुसार वादी यांनी नि.क्र.१८७ ची सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल करण्या अगोदर दिनांक १७.०५.२०२५ रोजी न्यायालयात वाई तालुका उप–निरीक्षक भुमी अभिलेख वाई यांचा अहवाल नि.क्र.१८६ लगत दाखल झालेला आहे.

त्यामुळे, वादीस त्याबाबत कल्पना किंवा माहिती नाही असे म्हणता येणार नाही. त्यामुळे, प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०४. वादी व प्रतिवादी यांच्या कथनांच्या अनुषंगाने अभिलेखावरील वादीचे नि.क्र.१८७ वरील सरतपासाचे प्रतिज्ञापत्राचे अवलोकन केले असता, वादीने त्याचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्रमांक २० मध्ये तालूका निरीक्षक, भुमी अभिलेख मार्फत दिनांक २०.०२.२०२३ रोजी गट क्रमांक ३२० व ३२१ ची मोजणी करण्यात आली असून त्याबाबतचा कोर्ट कमिशन अहवाल न्यायालयापुढे दाखल झालेला नसल्यामुळे सदर कोर्ट कमिशन अहवाल दाखल झाल्यानंतर वादी ज्यादा सरतपासाचे प्रतिज्ञापत्र देण्याचा अधिकार राखून ठेवत आहे असे कथन केले आहे. वादीने दिनांक १९.०७.२०२५ रोजी सरतपासाचे प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. प्रस्तुत दाव्यातील अभिलेखाचे अवलोकन केले असता, दिनांक १७.०७.२०२५ रोजी उप–अधिक्षक, भुमी अभिलेख वाई यांनी कोर्ट कमिशन अहवाल दाखल करावयाचा असल्यामुळे सदरचे प्रकरण बोर्डावरती घेण्यात आले. दिनांक १७.०७.२०२५ रोजी उप–अधिक्षक, भुमी अभिलेख, वाई यांनी कोर्ट कमिशन अहवाल दाखल केला. नि.क्र.१८६ वरील उप–अधिक्षक, भुमी अभिलेख, वाई यांनी दाखल केलेल्या कोर्ट कमिशन अहवाल दोन्ही पक्षकारांचे म्हणणे मागविण्यात आले. त्यानंतर, दिनांक १९.०७.२०२५ रोजी वादीने त्याचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. परंतु, वादीस दिनांक १७.०७.२०२५ रोजी उप–अधिक्षक, भुमी अभिलेख, वाई यांनी बोर्डावर प्रकरण घेवून कोर्ट कमिशन अहवाल दाखल केलेबाबतची माहिती वादीस नव्हती असे प्रथमदर्शनीय दिसून येते. तसेच, वादीने त्याचा ज्यादा सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचा हक्क व अधिकार अबाधित ठेवलेला आहे. त्यामुळे, वादातील मुळ मुद्दे गुणदोषांवर न्यायनिर्णीत करण्यासाठी वादीस त्याचे ज्यादा सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल करणेस परवानगी देणे न्यायाच्या दृष्टीने योग्य व संयुक्तीक होईल. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

अ) वादीचा निशाणी क्र.१९८ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

ब) वादीने पुढील तारखेस ज्यादा सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल करावे.

क) खर्चाबाबत आदेश नाहीत.

(आदेश खुल्या न्यायदान कक्षेत सांगुन घोषित करणेत आला.)

SHRIJA RAJENDRA SHINDE

Digitally signed by SHRIJA RAJENDRA SHINDE
Date: 2025.08.06 11:52:24 +0530

(श्रीमती एस. आर. शिंदे)
सह दिवाणी न्यायाधिश क-स्तर
वाई.

वाई.
दिनांकः- ०५/०८/२०२५.